दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

"सोयगावमध्ये कालव्याच्या दुरुस्तीची मागणी."

सोयगाव : प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यात शेतकऱ्यांनी सिंचन कालवा दुरुस्त करण्यासाठी तहसील कार्यालयाकडे मागणी केली. पाण्याअभावी रब्बी पिकांवर परिणाम होण्याची भीती आहे. शेतकऱ्यांनी तातडीने काम सुरू करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. स्थानिक प्रशासनाने पाहणी करण्याचे आश्वासन दिले. पुढील काही दिवसांत निर्णयाची अपेक्षा आहे.

आजचा सुविचार

काल जे झालं ते गेलं, आज जे आहे ते हातात आहे; मन शांत ठेव, पुढचं पाऊल नक्की सरळ पडेल."

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार दि. 28 नोव्हेंबर - 2026 ❀ वर्ष ;1 ❀ अंक ; 193 ❀ पाने .4 ❀ किमंत 4 रू ❀ email:hinduprakashvarta@gmail.com / Postal Regn ,No, ABD/551/2026/2028

थोडक्यात वार्ता

भगतसिंग नगरात सांडपाण्याचा प्रश्न गंभीर आठ दिवसांपासून नागरिक त्रस्त

छत्रपती संभाजीनगरमधील भगतसिंग नगर आणि अण्णाभाऊ साठे नगर परिसरात गेल्या आठ दिवसांपासून नाल्याचे सांडपाणी घरांमध्ये शिरत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तळवाडी फार्महाऊसवर पोलिसांची कारवाई दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी तळवाडी येथील फार्महाऊसवर कारवाई करून कथित वेश्याव्यवसायाचे प्रकरण उघडकीस आणले. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाहतूक पोलिसांकडून नागरिकांना दिलासा

छत्रपती संभाजीनगरमध्ये एकाच कुटुंबातील दोन सदस्यांना चुकीचे ई-चलान पाठविण्यात आल्याचे प्रकरण समोर आले होते. पोलिसांच्या छायाचित्रांमधून या त्रुटी उघड झाल्यानंतर संबंधित चुकीची चलने रद्द करण्यात आली.

घरांमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक

छत्रपती संभाजीनगर महापालिका आयुक्तांनी कर्मचाऱ्यांना आपल्या घरांमध्ये तीन महिन्यांच्या आत रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत पुरावा सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

छत्रपती संभाजीनगरमध्ये अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणारी चार खाद्यपदार्थांची दुकाने आणि मिठाई उत्पादक केंद्रे बंद केली. नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी ही कारवाई करण्यात आली.

16 किलो सोन्याची थरारक लूट! फुल्ल सिनेस्टाईल चोरी;

मुंबई : प्रतिनिधी



नवी मुंबई: नवी मुंबईमधील जुईनगर एमआयडीसी परिसरामध्ये एक अत्यंत खळबळजनक आणि धक्कादायक घटना घडली आहे. सोन्याची वाहतूक करणाऱ्या व्हॅनवर अज्ञात चार जणांच्या टोळीने धाडसी दरोडा टाकून तब्बल 16 किलोहून अधिक सोनं लुटून नेल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी प्राथमिक माहिती माध्यमांना दिली आहे. सध्याच्या बाजारभावानुसार चोरी करण्यात आलेल्या सोन्याची किंमत जवळपास 20 कोटी रुपयांच्या घरात असल्याचे सांगितले जात आहे. रात्रीच्या भयानक शांततेत भर रस्त्यावर घडलेल्या या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शिवाय, नागरिकांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जुईनगर एमआयडीसी परिसरातील सर्व्हिस रोडवरून सोन्याची वाहतूक करणारी व्हॅन जात असताना रात्रीच्या सुमारास हा हल्ला झाला. चार जणांच्या टोळीने वॅगनआर कारमधून येत व्हॅनचा मार्ग अडवला. त्यानंतर टोळीतील हल्लेखोरांनी व्हॅनमधील कर्मचाऱ्यांना अडवून मारहाण केली आणि त्यांच्या ताब्यातील सोन्याचा मोठा ऐवज लुटून घटनास्थळावरून पळ काढला. काही क्षणांतच घडलेल्या या थरारक प्रकारामुळे कर्मचाऱ्यांना सावरण्याचीही संधी मिळाली नाही आणि चोरट्यांनी ऐवजासह पोबारा केला. घटनेची माहिती मिळताच नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेसह स्थानिक पोलीस पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.प्राथमिक अंदाजानुसार लुटण्यात आलेल्या सोन्याचे वजन 16 किलोपेक्षा जास्त असून, त्याची किंमत सुमारे 20 कोटी रुपये इतकी आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात आहेत. मात्र, हे सोने नेमके कोणाचे होते, ते कुठून आणले जात होते आणि या व्हॅनमधून कोणत्याही प्रकारची तस्करी सुरू होती का, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. या दरोड्याची पद्धत आणि वेळेचे अचूक नियोजन पाहता, दरोडेखोरांना या व्हॅनमधून सोने नेले जात असल्याची माहिती आधीच मिळाली असावी, असा पोलिसांचा अंदाज आहे. तसेच या वाहनाचा नेमका मार्ग आणि हालचालींची माहिती आरोपींना ठाऊक असावी आणि त्यानुसारच त्यांनी संपूर्ण कट रचून हा दरोडा टाकला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. या संपूर्ण घटनेत दरोडेखोरांना आतूनच कोणी टीप दिली होती का, या दृष्टिकोनातूनही पोलीस सखोल तपास करत आहेत. तपासातील पुढील धागेदोरे लवकरच हाती लागण्याची शक्यता आहे.


अतिक्रमणांवर हातोडा ! कडक पोलीस बंदोबस्तात चांदवड नगरपरिषदेची धडक कारवाई,



चांदवड नगरपरिषदेने कडक पोलीस बंदोबस्तात बाजारपेठ आणि भाजीमंडईचा परिसर अतिक्रमणमुक्त केल्यामुळे शहरातील प्रस्तावित शिवस्मारकाचा मार्ग मोकळा झाला आहे. या धडक मोहिमेमुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या शिवस्मारकाच्या प्रत्यक्ष कामाला आता लवकरच गती मिळण्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.नगरपरिषद प्रशासनाने आज बाजारपेठेतील नियोजित शिवस्मारकाच्या जागेसह संपूर्ण भाजीमंडई परिसरातील अतिक्रमणे हटवून जागा पूर्णपणे मोकळी केली. या विशेष मोहिमेत नगरपरिषदेचे सर्वच अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बाजारपेठेतील मध्यवर्ती ठिकाणी भव्य शिवस्मारक साकारले जाणार असून, त्यासाठी आवश्यक असलेली जागा उपलब्ध करून देणे गरजेचे होते. प्रशासनाच्या या निर्णायक कारवाईमुळे स्थानिक नागरिक आणि शिवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण असून, स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आधी बॉयफ्रेंडला पळवलं, नंतर तरूणीवर जंगलात अत्याचार; घटनेमुळे नागपूर शहर हादरलं

नागपूर : प्रतिनिधी



: नागपूर शहरातील सोनेगाव तलाव परिसरापासून जवळ असलेल्या एका निर्जन जंगल भागात 19 वर्षीय तरुणीवर अत्याचार झाल्याची अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, पीडित तरुणी आपल्या प्रियकरासोबत सोनेगाव तलावाजवळील जंगलाच्या एका निर्जन परिसरामध्ये गेली होती. त्याच दरम्यान एका अनोळखी युवकाने तेथे आला आणि त्याने तरूणीसोबत हा संतापजनक प्रकार केला आहे.केलेल्या आरोपांनुसार, त्या युवकाने सर्वात आधी तरुणीच्या प्रियकराला बेदम मारहाण केली आणि त्याला घटनास्थळावरून पळून जाण्यास भाग पाडले. प्रियकर तिथून गेल्यानंतर आरोपीने असहाय्य झालेल्या तरुणीवर लैंगिक अत्याचार केला. इतक्यावरच न थांबता त्याने पीडितेची व्हिडिओ सुद्धा शुटिंग केली. त्यानंतर आरोपीने तरुणीकडील मौल्यवान वस्तू सुद्धा हिसकावून घेतल्या आणि ह्या व्हिडिओ त्याने सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिथून पोबारा केला. ही भयानक घटना घडल्यानंतर सुमारे 24 तासांच्या आत पीडित तरुणीने कुटुंबीयांसह सोनेगाव पोलीस ठाणे गाठले. तिथे तिने घडलेला संपूर्ण प्रकार सांगत आरोपीविरोधात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवला आणि पुढील तपास सुरू केला.रक्षकच चोर निघाले! पोलीस आणि DRI कर्मचाऱ्यांनी सोनाराच्या सोन्यावर डोळा; अन् पुढे..घटनेचे गांभीर्य लक्षात घेता सोनेगाव पोलीस ठाण्यासह गुन्हे शाखेची विविध पथके आरोपीचा शोध घेण्यासाठी कामाला लागली आहेत. तपासाचा भाग म्हणून पोलीस जंगल परिसरात ये- जा करण्याच्या मार्गांवर बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत आहेत. आरोपी नेमका कोणत्या मार्गाने घटनास्थळी आला आणि गुन्हा केल्यानंतर कोणत्या दिशेने पसार झाला, याचा शोध तपास पथकाकडून घेतला जात आहे. नागपूर गुन्हे शाखेचे उपायुक्त दीपक अग्रवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपूर्ण प्रकारात एकाच आरोपीचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपीचा माग काढण्यासाठी पोलिसांनी शोधमोहीम तीव्र केली आहे. तसेच संशयित आरोपीची ओळख पटवता यावी यासाठी पोलिसांनी त्याचा स्केचही प्रसिद्ध केला आहे. या स्केचच्या मदतीने तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे. विविध स्तरांवर तपास सुरू असून आरोपीला लवकरच ताब्यात घेतले जाईल, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

पुण्यातील बेकायदा होर्डिंग्जवरील कारवाईचे फडणवीसांकडून कौतुक

पुणे : प्रतिनिधी

पुणे शहरातील अतिक्रमण आणि बेकायदा होर्डिंग्जविरोधात महापालिका प्रशासनाने सुरू केलेल्या कारवाईचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले आहे. शहरातील रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागा नागरिकांच्या वापरासाठी मोकळ्या असणे आवश्यक आहे. त्यामुळे बेकायदा होर्डिंग्जवर नियमितपणे कारवाई झाली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शहरातील पायाभूत सुविधांचा वापर नागरिकांना योग्य प्रकारे करता आला पाहिजे. वाहनांसाठी रस्ते आणि पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळे असणे गरजेचे आहे. नियम केवळ कागदावर ठेवण्यासाठी नसतात, तर त्यांची अंमलबजावणी करणेही महत्त्वाचे असते. या नियमांचा मुख्य उद्देश सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुखकर करणे हा आहे.पुणे महापालिकेच्या 'पुणेरी' कारवाईचे कौतुकबेकायदा होर्डिंग्जची समस्या केवळ पुण्यापुरती मर्यादित नसून देशातील अनेक शहरांमध्ये ती दिसून येते. त्यामुळे अशा होर्डिंग्जविरोधात सातत्याने कारवाई होणे आवश्यक असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. पुणे महापालिका प्रशासनाने यासाठी स्वीकारलेली अभिनव आणि खास 'पुणेरी' पद्धत कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी मुख्यमंत्र्यांनी मिश्किल टिप्पणी केली. ते म्हणाले, "पुणे प्रशासनाला मी एवढेच सांगेन की, उद्या



माझ्या नावाचे बेकायदा होर्डिंग लागले, तर तुमच्या पुरस्कारांच्या यादीत माझेही नाव जाहीर करा!" त्यांच्या या विधानाची कार्यक्रमात विशेष चर्चा झाली. नागपूरमध्येही बेकायदा होर्डिंग्जविरोधात जनजागृती करायेत्या काळात नागपूर येथे विधिमंडळाचे अधिवेशन होणार आहे. अधिवेशनाच्या काळात राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात होर्डिंग्ज लावली जाण्याची शक्यता असते. त्यामुळे नागपूर महापालिका आणि प्रशासनाने आतापासूनच जनजागृती करावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. शहराचे सौंदर्य खराब होणार नाही आणि सार्वजनिक जागांवर बेकायदा होर्डिंग्ज लावली जाणार नाहीत, याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. नेते असोत किंवा कार्यकर्ते, त्यांनी जनतेमध्ये दिसले पाहिजे, बेकायदा होर्डिंग्जवर नाही, असा संदेशही देवेंद्र फडणवीस यांनी दिला.



जीवघेणा नायलॉन मांजा! यवतमाळमध्ये वृद्धाचा कान तुटून पडला

यवतमाळ : प्रतिनिधी

यवतमाळ : शहरात नायलॉन मांजामुळे पुन्हा एकदा एक अत्यंत हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. मोटारसायकलवरून प्रवास करत असताना नायलॉन मांजामुळे चक्क एका वयोवृद्धाचा कान तुटून खाली पडला. या अपघातात रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या वृद्धाला तातडीने उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना शहरातील नागपूर रोडवरील मकवानी ले-आउट परिसरात घडली. जखमी वृद्धाचे नाव हसीबउल्लाह इनामदार (वय 65, रा. मकवानी ले-आउट, यवतमाळ) असे आहे.

दरवर्षी नायलॉन मांजाचा जीवघेणा धोका समोर येऊनही त्यावर पूर्णपणे आळा बसलेला नाही. नायलॉन मांजाच्या विक्री आणि खरेदीवर बंदी असतानाही अनेक भागांत लहान मुलांच्या हाती आतापासूनच नायलॉन मांजाची धोकादायक दोर दिसून येत आहे. यातून निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येत असून अनेक गंभीर अपघात घडत असल्याचे चित्र स्पष्टपणे पाहायला मिळत आहे.बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडलेल्या या घटनेत हसीबउल्लाह इनामदार आपल्या मोटारसायकलवरून घराच्या दिशेने निघाले होते. त्याच दरम्यान एका ऑटोला नायलॉन मांजा अडकला होता. वाहन चालवत असताना ही जीवघेणी दोर त्यांच्या लक्षात येऊ शकली नाही. अचानक नायलॉन मांजा अडकल्याने



तीव्र घर्षण होऊन त्यांचा कान थेट रस्त्यावर तुटून पडला. या अनपेक्षित आणि भयानक घटनेमुळे ते पूर्णपणे गोंधळून गेले.रक्तबंबाळ अवस्थेत ते आपली मोटारसायकल बाजूला सोडून खाली बसले असता घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली. परिसरातील नागरिकांनी तातडीने मदत करत त्यांना जवळील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेले. रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांच्यावर तत्काळ उपचार करत तात्पुरत्या स्वरूपात टाके घालून कान पुन्हा बसविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, हा कान पूर्वीप्रमाणे पूर्ववत होईल की नाही, याबाबत अद्याप चिंता व्यक्त केली जात आहे. या दुर्दैवी घटनेमुळे मकवानी ले-आउटसह संपूर्ण यवतमाळ शहरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. बंदी असलेला नायलॉन मांजा कोठून आणि कसा उपलब्ध होतो, तसेच तो वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई का होत नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन नायलॉन मांजा विक्रेत्यांवर आणि वापरकर्त्यांवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकिय

ग्राहक नव्हे, निर्माते व्हा!

तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी कल्पकतेला पर्याय नसतो. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मानवी सर्जनशीलतेचे महत्त्व अधोरेखित होत असतानाच, भारतासमोर जागतिक गेमिंग क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्याची मोठी संधी आहे. गरज आहे ती केवळ तंत्रज्ञानाची नव्हे, तर आपल्या सांस्कृतिक सामर्थ्याची जाणीव असलेल्या दूरदृष्टीची. एकेकाळी चित्रपट आणि संगीत ही मनोरंजनाची प्रमुख साधने मानली जात होती; मात्र आता व्हिडिओ गेमिंगने या दोन्ही क्षेत्रांना मागे टाकत स्वतंत्र आणि प्रचंड मोठी जागतिक बाजारपेठ निर्माण केली आहे. 'ग्रँड थेफ्ट ऑटो' अर्थात 'जीटीए' या व्हिडिओ गेमच्या नव्या आवृत्तीने जगभरात निर्माण केलेली उत्सुकता आणि त्यासाठी झालेली अब्जावधी डॉलरची गुंतवणूक हे या बदलाचे ठळक उदाहरण आहे. एका व्हिडिओ गेमच्या निर्मितीसाठी हजारो गेमिंगतज्ज्ञ अनेक वर्षे मेहनत घेतात, प्रचंड आर्थिक गुंतवणूक केली जाते आणि त्यातून केवळ मनोरंजनाचे साधन नव्हे, तर एक स्वतंत्र आभासी विश्व उभे केले जाते. हे विश्व जगभरातील लाखो लोकांना आकर्षित करते. त्यामुळे गेमिंगकडे केवळ तरुणांचा विरंगुळा म्हणून पाहण्याचे दिवस आता संपले आहेत. तंत्रज्ञान, कला, कल्पकता, व्यवसाय आणि रोजगार यांचा संगम असलेले हे भविष्यातील महत्त्वाचे उद्योगक्षेत्र आहे. या बदलत्या वास्तवात भारताने आपली भूमिका काय ठेवायची, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

जागतिक गेमिंग बाजारपेठेचा विस्तार पाहिला, तर त्यातील संधींची व्याप्ती लक्षात येते. जगभरातील व्हिडिओ गेमिंगचा महसूल सुमारे दोनशे अब्ज डॉलरच्या घरात पोहोचला आहे. चित्रपट आणि संगीत या दोन मोठ्या मनोरंजन उद्योगांच्या एकत्रित कमाईपेक्षाही हा आकडा मोठा आहे. भारतासाठी ही बाजारपेठ विशेष महत्त्वाची आहे. सुमारे ५५ कोटी खेळाडू असलेला भारत हा जगातील सर्वांत मोठ्या मोबाईल गेमिंग बाजारपेठांपैकी एक आहे. २०२५ मध्ये भारतीय गेमिंग क्षेत्राचा महसूल एक अब्ज डॉलरच्या पुढे गेला. देशातील वाढती इंटरनेट उपलब्धता, स्वस्त डेटा, स्मार्टफोनचा विस्तार आणि डिजिटल माध्यमांशी जोडली गेलेली तरुण पिढी यामुळे या क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे; मात्र या संख्यात्मक सामर्थ्याचे रूपांतर जागतिक स्तरावर नावाजल्या जाणाऱ्या भारतीय उत्पादनांमध्ये झाले आहे का, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. भारतीय गेमिंग क्षेत्रासमोरची सर्वांत मोठी विसंगती याच ठिकाणी दिसते. भारतात कोट्यवधी लोक व्हिडिओ गेम खेळतात. परदेशी कंपन्यांच्या खेळांसाठी पैसे खर्च करतात. जागतिक दर्जाचे गेम तयार करणाऱ्या कंपन्यांमध्ये भारतीय अभियंते आणि विकासक महत्त्वाची भूमिका बजावतात. 'जीटीए ६'च्या निर्मितीत बंगळुरूमधील सुमारे १,६०० भारतीय विकासकांनी योगदान दिल्याचे नमूद केले जाते. भारतीय तरुणांकडे कौशल्य आहे, तांत्रिक क्षमता आहे आणि जागतिक दर्जाच्या प्रकल्पांवर काम करण्याची पात्रताही आहे. तरीही भारतीय संस्कृती, इतिहास, लोककथा आणि सामाजिक वास्तव यांचे प्रतिबिंब असलेला जागतिक स्तरावर लोकप्रिय ठरलेला एखादा मोठा गेम आपल्याला निर्माण करता आलेला नाही. दुसऱ्यांच्या कल्पनांना आकार देण्याचे कौशल्य आपल्याकडे आहे; मात्र स्वतःच्या कल्पनांमधून जागतिक बाजारपेठेत ठसा उमटवण्याच्या बाबतीत आपण मागे आहोत. ही केवळ उद्योगक्षेत्रातील उणीव नाही, तर देशाच्या सर्जनशील आणि उद्योजकीय क्षमतेपुढील आव्हान आहे. भारताची ओळख दीर्घकाळ जागतिक कंपन्यांना कुशल मनुष्यबळ आणि तांत्रिक सेवा पुरवणारा देश अशी राहिली आहे. माहिती तंत्रज्ञानापासून विविध डिजिटल सेवांपर्यंत भारतीयांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे; परंतु सेवा पुरवण्याच्या पलीकडे जाऊन स्वतःची उत्पादने, स्वतःचे तंत्रज्ञान आणि स्वतःची बौद्धिक संपदा निर्माण करण्याची गरज आहे. गेमिंग क्षेत्रातही हाच दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. जागतिक कंपन्यांसाठी काम करणे गैर नाही; उलट त्यातून अनुभव आणि कौशल्य मिळते; परंतु त्याच अनुभवाचा उपयोग करून भारतीय कंपन्यांनी स्वतःचे खेळ विकसित केले पाहिजेत. त्यासाठी केवळ मोठ्या गुंतवणुकीची अपेक्षा ठेवून चालणार नाही. बाजारपेठेचा अभ्यास, उत्तम कथानक, संशोधन, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि दीर्घकालीन व्यावसायिक नियोजन यांची सांगड घालावी लागेल. भारतीय संस्कृती आणि इतिहास हा गेमिंगसाठी मोठा स्रोत ठरू शकतो. रामायण, महाभारत, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, विविध राजवटी, प्रादेशिक लोककथा, आदिवासी संस्कृती, ऐतिहासिक स्थळे आणि भारतातील सामाजिक वैविध्य यांतून असंख्य कथानके निर्माण होऊ शकतात. जगभरातील खेळाडूंना आकर्षित करणारे आभासी विश्व या कथांच्या आधारे उभे करता येऊ शकते; मात्र भारतीय विषय घेतला म्हणजे खेळ आपोआप जागतिक दर्जाचा होईल, असे नाही.

केवळ पौराणिक पात्रे किंवा ऐतिहासिक घटना दाखवणे पुरेसे ठरणार नाही. त्यासाठी कथानकातील वेगळेपणा, पात्रांची बांधणी, खेळातील आव्हाने, दृश्यात्मक गुणवत्ता, तांत्रिक सफाई आणि खेळाडूला मिळणारा अनुभव या प्रत्येक बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे लागेल. भारतीय संस्कृतीची ओळख जपत असताना जागतिक दर्जाचे सादरीकरण करण्याचे आव्हान स्वीकारावे लागेल. स्थानिक विषयांना जागतिक अपील देणे हीच भारतीय निर्मात्यांची खरी कसोटी असेल. या संपूर्ण प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका निर्णायक ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आगमनाने अनेक उद्योगांच्या कामकाजाचे स्वरूप बदलू लागले आहे. माहितीचे विश्लेषण, संगणकीय आज्ञावली लिहिणे, दृश्यनिर्मिती, संवादलेखन आणि अनेक तांत्रिक प्रक्रिया यांचा वेग वाढवण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे. त्यामुळे कमी मनुष्यबळ आणि मर्यादित साधनसंपत्ती असलेल्या छोट्या निर्मात्यांही मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. पूर्वी जागतिक दर्जाचा गेम तयार करण्यासाठी प्रचंड आर्थिक ताकद, हजारो कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ आणि अनेक वर्षांचा कालावधी आवश्यक होता. आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे काही प्रक्रिया अधिक वेगाने आणि कमी खर्चात पूर्ण करणे शक्य होत आहे. त्यामुळे नवउद्योजक आणि छोट्या निर्मात्यांसाठी स्पर्धेची नवी दारे उघडत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे मानवी सर्जनशीलतेचे महत्त्व कमी होईल, असे मानणे चुकीचे ठरेल. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी एखादी कल्पना जन्माला घालणे, तिच्यातून वेगळा अनुभव निर्माण करणे आणि त्या अनुभवाशी लोकांचे भावनिक नाते जोडणे, यासाठी मानवी संवेदनशीलता आवश्यक असते. एखाद्यानोरंजनाचे क्षेत्र न मानता एक व्यापक उद्योग म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. या क्षेत्रासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यावर भर द्यायला हवा. कल्पकतेची कमतरता नाही. डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी आहे. जागतिक बाजारपेठेची दारे खुली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्मितीच्या प्रक्रियेत नवे पर्याय उपलब्ध होत आहेत. अशा वेळी भारताने केवळ मोठ्या गेमिंग बाजारपेठेचा ग्राहक म्हणून समाधान मानू नये. गेमिंग क्षेत्रात जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा निर्माता देश बनण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. 'जीटीए'सारख्या खेळांचे यश आपल्याला या बाजारपेठेची अफाट ताकद दाखवते, तर कृत्रिम बुद्धिमत्तेचा विस्तार कमी साधनांतूनही मोठी निर्मिती करण्याची संधी देतो. या दोन्ही बदलांचा उपयोग भारताने स्वतःची स्वतंत्र ओळख

आधुनिक जीवनशैलीच्या धावपळीत हरवत चाललेली माणुसकी, आपुलकी आणि नात्यांमधील जिव्हाळा!

आजच्या आधुनिक युगात माणसाने प्रचंड प्रगती केली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग आणि व्यापार अशा प्रत्येक क्षेत्रात माणूस नवनवीन उंची गाठत आहे. पूर्वी ज्या गोष्टी मिळवण्यासाठी अनेक दिवस लागायचे, त्या आज काही क्षणांत उपलब्ध होत आहेत. मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन व्यवहार आणि आधुनिक सुखसोयींमुळे जीवन अधिक सोयीस्कर झाले आहे. माणसाच्या हातात पैसा आला, घरात सुखसोयी आल्या, गाडी आली, मोठमोठी घरे उभी राहिली; परंतु या सर्व प्रगतीच्या प्रवासात एक महत्त्वाची गोष्ट हळूहळू मागे पडत चालली आहे, ती म्हणजे माणसामाणसांमधील नात्यांची आज प्रत्येकजण पैसा कमावण्याच्या स्पर्धेत धावत आहे. अधिक कमाई, मोठे घर, महागडी गाडी, प्रतिष्ठा आणि समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करण्याची धडपड सुरू आहे. मात्र, या धावपळीत आपल्या जवळच्या माणसांसाठी वेळ आहे का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. कारण पैसा जीवनातील अनेक गरजा पूर्ण करू शकतो; पण मनाला मिळणारी शांतता, प्रेमाची ऊब आणि नात्यांमधील विश्वास विकत घेता येत

१. पैशाच्या मागे धावताना माणूस माणसांपासून दूर गेला!
एक काळ असा होता की घरात पैसा कमी असला तरी आनंदाची कमतरता नव्हती. छोट्याशा घरात संपूर्ण कुटुंब एकत्र राहत असे. घरात दोन वेळचे जेवण साधे असले तरी सर्वजण एकत्र बसून जेवत असत. दिवसातील सुख-दुःख एकमेकांना सांगितले जात असे. शेजारीपाजारी एकमेकांच्या मदतीला धावून येत असत. आज परिस्थिती बदलली आहे. मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्या, घरात आधुनिक वस्तू आल्या, प्रत्येकाच्या हातात मोबाईल आले; पण एकाच घरात राहणाऱ्या माणसांमध्ये संवाद कमी झाला. पूर्वी घरातील माणसे एकमेकांशी बोलण्यासाठी वेळ काढत असत, आज मात्र एकमेकांशी बोलण्यापेक्षा मोबाईलवर तासन्तास वेळ घालवला जातो. आपण प्रगती केली, पण या प्रगतीसोबत आपली माणुसकीही वाढली का? हा विचार करण्याचा विषय आहे. पैसा कमावणे चुकीचे नाही. प्रत्येकाने आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे; परंतु त्यासाठी आपली नातीच कमकुवत होत असतील, तर त्या यशाचा अर्थ काय?

२. एकाच छताखाली राहणारी माणसे,!
आज अनेक घरांमध्ये एक वेगळे चित्र पाहायला मिळते. घरात आई-वडील, मुलगा, सून आणि नातवंडे सर्वजण एकत्र राहतात; पण प्रत्येकाचे जग वेगळे झाले आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत प्रत्येकजण आपापल्या. पूर्वी संध्याकाळी घरातील सर्वजण एकत्र बसून दिवसाचा अनुभव सांगत असत. आज मात्र जेवणाच्या टेबलावरही प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो. आईने विचारले, आजचा दिवस कसा गेला? तर उत्तर देण्याऐवजी मुलाचे. घरात सर्व सुखसोयी असतात, पण मनमोकळेपणाने बोलण्यासाठी माणूस मिळत नाही. घर मोठे असण्यापेक्षा त्या घरातील माणसांची मने मोठी असणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण घर भिंतींनी बनते, पण कुटुंब प्रेमाने आणि विश्वासाने उभे राहते.

३. वृद्ध आई-वडिलांच्या डोळ्यांतील!
या बदलत्या समाजव्यवस्थेतील सर्वांत वेदनादायक चित्र म्हणजे वृद्ध आई-वडिलांचे एकटेपण. ज्या आई-वडिलांनी आपल्या मुलांच्या भविष्यासाठी आयुष्यभर कष्ट केले, स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवल्या, मुलांना चांगले शिक्षण दिले आणि त्यांच्या सुखासाठी आयुष्य खर्च केले, त्याच आई-वडिलांना वृद्धापकाळात मुलांच्या सहवासासाठी. त्यांना मोठ्या घराची, महागड्या कपड्यांची किंवा पैशांची नेहमीच अपेक्षा असते असे नाही. अनेकदा त्यांना फक्त मुलांनी दोन प्रेमाचे शब्द बोलावेत, थोडा वेळ त्यांच्या जवळ बसावे, त्यांच्या तब्येतीची विचारपूस करावी, एवढीच. आई-वडिलांना पैसा नव्हे, तर मुलांचा वेळ आणि प्रेम अधिक मोलाचे वाटते. हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. कारण आज आपण आपल्या आई-वडिलांसाठी वेळ काढला नाही, तर उद्या आपल्या मुलांकडून वेळेची अपेक्षा करण्याचा नैतिक अधिकार तरी आपल्याला सा?

४. मैत्रीही आता स्वार्थाच्या तराजूत मोजली जाते का?
मैत्री ही नात्यांमधील सर्वांत सुंदर भावना मानली जाते. पूर्वी मित्र म्हणजे सुख-दुःखात सोबत उभा राहणारा, अडचणीत मदतीचा हात देणारा आणि कोणताही स्वार्थ न ठेवता साथ देणारा माणूस. आज सोशल मीडियावर हजारो मित्र असतात. वाढदिवसाला शेकडो शुभेच्छा मिळतात, फोटोवर लाईक्स आणि कमेंट्सचा पाऊस पडतो. मात्र, प्रत्यक्ष अडचणीच्या वेळी फोन उचलणारे किती असतात? दुःखाच्या प्रसंगी जवळ येणारे किती असतात? काही नाती केवळ आर्थिक व्यवहारांपुरती मर्यादित होत चालली आहेत. ज्याच्याकडे पैसा आहे, प्रतिष्ठा आहे, त्याच्याभोवती गर्दी दिसते; पण अडचणीच्या काळात तीच गर्दी हळूहळू कमी होते. खरी मैत्री पैशावर नव्हे, तर विश्वासावर उभी असते. त्यामुळे नाती जोडताना स्वार्थापेक्षा माणुसकीला महत्त्व देणे गरजेचे आहे.

५. सोशल मीडियावर जवळीक, प्रत्यक्ष आयुष्यात दुरावा!
तंत्रज्ञानाने संपूर्ण जग आपल्या हातात आणून ठेवले आहे. काही सेकंदांत आपण जगाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या व्यक्तीशी संवाद साधू शकतो. फोटो, व्हिडिओ आणि संदेशांच्या माध्यमातून संपर्क ठेवू शकतो. मात्र, या आभासी जगात रममाण होताना प्रत्यक्ष आयुष्यातील नाती दुर्लक्षित होत आहेत का, हा गंभीर. आपण दुसऱ्यांच्या आनंदाचे फोटो पाहतो, त्यांना शुभेच्छा देतो; पण आपल्या घरातील माणूस दुःखी आहे का, त्याला काही अडचण आहे का, हे विचारण्यास विसरतो. मोबाईलवर तासन्तास वेळ घालवणारा माणूस कधी कधी घरातील व्यक्तीशी दहा मिनिटेही मनापासून बोलत नाही. तंत्रज्ञान हे माणसाला जोडण्यासाठी निर्माण झाले आहे, माणसांमधील अंतर वाढवण्यासाठी नव्हे. त्यामुळे मोबाईलचा वापर करावा, पण मोबाईलला आपल्या नात्यांपेक्षा मोठे स्थान देऊ नये.

६. पैशाने वस्तू मिळतात, पण प्रेम विकत मिळत नाही!
आज पैसा हा जीवनाचा महत्त्वाचा भाग झाला आहे. शिक्षण, आरोग्य, निवारा आणि सुरक्षित भविष्यासाठी पैसा आवश्यक आहे. आर्थिक स्थैर्याशिवाय अनेक अडचणी निर्माण होतात, हेही वास्तव आहे. त्यामुळे पैशाला कमी लेखणे योग्य ठरणार नाही. मात्र, पैशाला जीवनातील सर्वांत मोठे स्थान देणेही चुकीचे आहे. पैशाने महागडा पलंग खरेदी करता येतो, पण शांत झोप विकत घेता येत नाही. मोठे घर बांधता येते, पण त्या घरात आनंदाचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रेम आणि आपुलकी आवश्यक असते. महागडी भेटवस्तू देता येते, पण मनापासून दिलेल्या एका मिठीची किंमत त्यापेक्षा अधिक असते. माणसाने पैसा कमवावा, पण पैसा कमावताना माणसे गमावू नयेत. कारण संपत्ती मागे राहते, पण आपल्या प्रेमाच्या आठवणी माणसांच्या मनात कायम.

७. बदलत्या समाजात नाती जपण्याची जबाबदारी कोणाची?
नाती टिकवण्यासाठी केवळ एकाच व्यक्तीने प्रयत्न करून चालत नाही. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने समजूतदारपणा दाखवणे गरजेचे आहे. लहानांनी मोठ्यांचा आदर करावा, मोठ्यांनी लहानांना समजून घ्यावे. मतभेद झाले तरी संवाद बंद करू नये. रागाच्या भरात बोललेले शब्द अनेक वर्षांची नाती दुखावू शकतात. नात्यांमध्ये अहंकारापेक्षा समजूतदारपणा, संशयापेक्षा विश्वास आणि स्वार्थापेक्षा प्रेम महत्त्वाचे आहे. एखाद्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती कमकुवत असली तरी तिच्या भावनांची किंमत कमी होत नाही. माणसाचे मूल्य त्याच्या बँक खात्यातील रकमेवर ठरू. आपण आपल्या मुलांना मोठे शिक्षण देतो, चांगले करिअर घडवतो; पण त्याचबरोबर दुसऱ्यांच्या भावना समजून घेण्याचे संस्कारही देतो का? हा प्रश्न प्रत्येक पालकाने विचारला पाहिजे.


८. अजूनही माणुसकी जिवंत आहे!
आजच्या काळात नाती कमकुवत होत असल्याची अनेक उदाहरणे दिसत असली, तरी समाजात माणुसकीची असंख्य सुंदर उदाहरणेही आहेत. संकटात मदतीला धावून जाणारे अनोळखी नागरिक, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणारे दानशूर व्यक्ती, वृद्धांना आधार देणारे तरुण, रक्तदान करणारे युवक आणि आपत्तीच्या काळात निःस्वार्थ सेवा करणारे हात आजही. हीच माणुसकीची खरी श्रीमंती आहे. एखाद्याला मदत करताना त्याच्याकडून काही अपेक्षा न ठेवणे, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे आणि कोणाच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी प्रयत्न करणे, या गोष्टी पैशापेक्षा अधिक मौल्यवान आहेत. माजातमाणुसकी टिकवायची असेल, तर अशा चांगल्या कृतींचा आदर्श आपण स्वतःच्या जीवनात स्वीकारला.

९. पुन्हा एकदा नात्यांना वेळ देण्याची!
आज प्रत्येकाने स्वतःच्या जीवनात काही छोटे बदल केले, तरी नात्यांमधील गोडवा पुन्हा निर्माण होऊ शकतो. दिवसातून काही वेळ कुटुंबासाठी राखून ठेवणे, आई-वडिलांशी मनमोकळा संवाद साधणे, मुलांचे म्हणणे ऐकून घेणे, मित्रांची विचारपूस करणे आणि गरजूंना मदत करणे, या छोट्या कृती नात्यांना बळकटी देतात. सण-उत्सव केवळ फोटो काढण्यासाठी नसतात, तर एकत्र येण्याची संधी असतात. वाढदिवसाला महागडी भेट देण्यापेक्षा प्रेमाने दिलेल्या शुभेच्छा अधिक महत्त्वाच्या असतात. नात्यांमध्ये नियमित संवाद आणि परस्पर आदर असेल, तर अनेक गैरसमज दूर होऊ. माणसाने आयुष्यात किती पैसा कमावला यापेक्षा किती माणसे मनापासून जोडली, हे अधिक महत्त्वाचे.

समारोप :
आज समाजाने आर्थिक प्रगती केली, आधुनिकतेचा स्वीकार केला आणि जीवन अधिक गतिमान बनवले. मात्र, या प्रगतीच्या प्रवासात नात्यांमधील जिव्हाळा हरवू नये, हीच खरी काळजी आहे. पैसा आवश्यक आहे, पण तोच जीवनाचा अंतिम उद्देश असू शकत नाही. संपत्तीने घर सजते, पण प्रेमाने घराला घरपण येते. एक दिवस असा येतो, जेव्हा माणूस आपल्या आयुष्याकडे मागे वळून पाहतो. त्या वेळी त्याला किती पैसा कमावला, किती मोठे घर बांधले किंवा किती महागडी गाडी घेतली यापेक्षा आपल्या सोबत कोण उभे राहिले, कोणाच्या चेहऱ्यावर आपण हसू आणले आणि कोणाला आपण प्रेम दिले, याच गोष्टी आठवतात. म्हणूनच आज प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे की, आपण पैसा कमावण्याच्या नादात आपली माणसे तर गमावत नाही ना? कारण पैसा संपला तर पुन्हा कमावता येतो, संपत्ती गेली तर पुन्हा उभी करता येते; पण एकदा तुटलेली नाती आणि निघून गेलेली माणसे पुन्हा पूर्वीसारखी मिळतीलच याची खात्री नसते. आज गरज आहे ती पैशासोबत माणुसकीही कमावण्याची, मोठ्या घरासोबत मोठे मन ठेवण्याची आणि आधुनिकतेसोबत आपली संस्कृती व नात्यांचा जिव्हाळा जपण्याची. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते — श्रीमंत होण्यासाठी पैसा कमवा; पण खऱ्या अर्थाने मोठे होण्यासाठी माणसे जोडा. कारण आयुष्याची खरी श्रीमंती बँकेच्या खात्यात नसते, ती आपल्या माणसांच्या मनात असते!

भुसावळ-नागपूर 'दादाजी धाम' एक्स्प्रेसला मंजुरी

भुसावळ : प्रतिनिधी



भुसावळ आणि नागपूरदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. कोविड काळात बंद झालेली भुसावळ-नागपूर दादाजी धाम एक्स्प्रेस पुन्हा सुरू करण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. ही गाडी आता नवीन क्रमांकाने भुसावळ-खंडवा-इटारसी-बैतूल मार्गे धावणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.नवीन क्रमांकाने धावणार एक्स्प्रेसनागपूर-भुसावळ दादाजी धाम एक्स्प्रेस (22111/22112) ही गाडी कोविड काळात बंद करण्यात आली होती. या गाडीमुळे खंडवा, बऱ्हाणपूर, नेपानगर आणि निमाड परिसरातील प्रवाशांना भुसावळ व नागपूरला जाणे सोयीचे होत होते. मात्र, सेवा बंद झाल्यामुळे प्रवाशांना पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत होता.आता रेल्वे मंत्रालयाने या मार्गावर नवीन गाडी सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या एक्स्प्रेसचे नवीन क्रमांक 11111/11112 असणार आहेत. भुसावळ, खंडवा, इटारसी आणि बैतूलमार्गे ही गाडी नागपूरपर्यंत धावणार आहे.खासदारांच्या पाठपुराव्याला यशही रेल्वे सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी निमाड परिसरातील प्रवासी आणि भाविकांकडून सातत्याने मागणी केली जात होती. खंडवाचे खासदार ज्ञानेश्वर पाटील यांनी 26 जून 2026 रोजी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन या मागणीसंदर्भात निवेदन दिले होते. त्यानंतर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर रेल्वे मंत्रालयाने या गाडीला मंजुरी दिली.भाविक, विद्यार्थी आणि व्यापाऱ्यांना फायदा खंडवा येथील दादाजी धाम मंदिरात दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी ही गाडी महत्त्वाची ठरणार आहे. याशिवाय विद्यार्थी, नोकरदार आणि व्यापाऱ्यांनाही भुसावळ-नागपूरदरम्यान थेट रेल्वे प्रवासाची सुविधा मिळणार आहे. दरम्यान, गाडी सुरू होण्याची निश्चित तारीख, वेळापत्रक आणि स्थानकांवरील थांब्यांची माहिती अद्याप जाहीर झालेली नाही. रेल्वे प्रशासनाकडून याबाबत अधिकृत घोषणा झाल्यानंतर प्रवाशांना प्रवासाचे नियोजन करता येणार आहे.

पुण्यातील कॅम्प परिसरात बेवारस बॅगमुळे खळबळ, बॉम्बशोधक पथकाची तातडीने धाव



पुणे : प्रतिनिधी

पुणे : पुण्यातील कॅम्प परिसरातील 15 ऑगस्ट चौकाजवळ एका बँकेबाहेर बेवारस बॅग आढळल्याने शुक्रवारी काही काळ घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. खबरदारीचा उपाय म्हणून बॉम्ब शोधक व नाशक पथकाला (BDDS) बोलावून बॅगेची तपासणी करण्यात आली. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी दिली पोलिसांना माहितीमिळालेल्या माहितीनुसार, बँकेच्या कर्मचाऱ्यांना आवाराबाहेर एक बेवारस बॅग आढळली. त्यांनी तातडीने पोलिसांना याबाबत कळवले. माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. बॅगेमध्ये संशयास्पद वस्तू किंवा स्फोटक पदार्थ असण्याची शक्यता लक्षात घेऊन बीडीडीएस पथकालाही पाचारण करण्यात आले.बीडीडीएस पथकाकडून बॅगेची तपासणीतपासणी सुरू असताना खबरदारी म्हणून पोलिसांनी परिसरातील नागरिकांची ये-जा रोखली आणि आजूबाजूचा भाग काही काळासाठी बंद केला. त्यामुळे गजबजलेल्या कॅम्प परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.मात्र, बीडीडीएस पथकाने केलेल्या तपासणीत बॅगेमध्ये कोणतीही संशयास्पद किंवा धोकादायक वस्तू आढळली नाही. तसेच बॉम्ब किंवा स्फोटक पदार्थ असल्याची शक्यताही फेटाळण्यात आली. तपासणी पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी परिसरातील निर्बंध हटवले आणि जनजीवन पूर्ववत झाले.या घटनेमुळे काही काळ परिसरात तणाव निर्माण झाला होता. मात्र, तपासणीत धोका नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

इफ्फीच्या मंचावर मराठी चित्रपटाची भावुक झलक!

गोव्यात सुरू असलेल्या 57 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) येथे लव फिल्म्स फिल्म्सची दुसरी मराठी निर्मिती असलेल्या 'तू आहेस ना' या चित्रपटाचा प्रीमियर पार पडला. या प्रीमियरला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून 450 हून अधिक प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या सभागृहात चित्रपटाचे प्रदर्शन झाले. भावूक क्षण, प्रेक्षकांची दाद आणि टाळ्यांचा कडकडाट अशा वातावरणात हा विशेष सोहळा रंगला.या प्रदर्शनाला चित्रपटातील प्रमुख कलाकार सुप्रिया पिळगावकर आणि सिद्धार्थ बोडके यांच्यासह लेखक-दिग्दर्शक दिपक गावडे आणि निर्माते अंकुर गर्ग उपस्थित होते. या चित्रपटातील कथा पुढे जात असताना त्यातील भावविश्व आणि कलाकारांच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श केला. सुप्रिया पिळगावकर आणि सिद्धार्थ बोडके यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखांमधील सहजता, संवेदनशीलता आणि बारकावे यांचे प्रेक्षकांनी विशेष कौतुक केले. त्यांच्या अभिनयाला सभागृहातून उत्स्फूर्त दाद मिळाली.अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर काय म्हणाल्या?इफ्फीसाठी आपल्या चित्रपटाची निवड होणं हे आपला चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ आहे, असं मला वाटतं. या चित्रपटाकडे मला आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे माझा एक अत्यंत वैयक्तिक अनुभव, आणि हाच चित्रपट स्वीकारण्यामागचं माझं एक प्रमुख कारण ठरलं. याशिवाय, लव रंजन आणि अंकुर गर्ग या हिंदी चित्रपटसृष्टीतील दोन मुख्य प्रवाहातील निर्मात्यांनी मराठीतील इतक्या संवेदनशील कथेची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला, ही गोष्टही माझ्यासाठी प्रोत्साहन देणारी होती. दीपक यांनी केलेलं कथाकथन, पटकथेतील ताकद आणि या कथेवर त्यांनी दाखवलेला विश्वास, या विशेषतः, इथे येण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे. या संधीसाठी मी लव सर, अंकुर आणि दीपक यांचा मनापासून आभारी आहे. सुप्रिया ताईंसोबत काम करणं आणि त्यांच्यासोबत अनेक भावभावना अनुभवणं हा माझ्यासाठी एक खास अनुभव होता. लहानपणापासूनच मी त्यांच्या कामाचा चाहता असल्यामुळे हा अनुभव आणखी विशेष ठरला.या खास सोहळ्याला सिद्धार्थचे कुटुंबीयही उपस्थित होते. चित्रपटाचा वर्ल्ड प्रीमियर प्रत्यक्ष पाहाण्याचा त्यांचा हा क्षण कुटुंबासाठीही अविस्मरणीय ठरला. संपूर्ण भरलेले सभागृह, प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव आणि चित्रपट संपल्यानंतर झालेला टाळ्यांचा कडकडाट यामुळे 'तू आहेस ना'च्या संपूर्ण टीमसाठी इफ्फीतील हा वर्ल्ड प्रीमियर विशेष ठरला. लव फिल्म्स प्रस्तुत 'तू आहेस ना' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन दिपक गावडे यांनी केले आहे. लव रंजन आणि अंकुर गर्ग यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट 2027 मध्ये चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

वाहनांच्या प्रलंबित ई-चलान दंडात २० टक्के सूट

मुंबई : प्रतिनिधी

मुंबई : वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी प्रलंबित असलेल्या ई-चलानच्या दंडाची वसुली करण्यासाठी राज्य सरकारने वाहनधारकांना २० टक्के सवलतीची संधी दिली आहे. 'महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना-२०२६' येत्या १ डिसेंबरपासून संपूर्ण राज्यात लागू होणार असून, तीन टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत जुन्या आणि नव्या पात्र चलानांवर सवलत मिळणार आहे. २१ जानेवारी ते ३० नोव्हेंबर २०२६ या काळात बजावलेल्या आणि प्रलंबित असलेल्या चलानांसाठी सवलतीनंतरची ८० टक्के रक्कम ३० दिवसांत भरावी लागेल. तर १ डिसेंबरपासून बजावण्यात येणाऱ्या चलानांवर ४५ दिवसांत भरणा केल्यास २० टक्के सूट मिळेल. न्यायालयात प्रलंबित असलेल्या पात्र चलानांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे.गृह विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. त्यानुसार, पहिल्या टप्प्यात २१ जानेवारी ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत बजावलेली आणि १ डिसेंबर रोजी वसुलीसाठी प्रलंबित असलेली पात्र ई-चलाने समाविष्ट असतील. या चलानांच्या थकित तडजोड रकमेवर २० टक्के सूट मिळेल. सवलतीनंतरची रक्कम योजना सुरू झाल्यापासून ३० दिवसांच्या आत भरावी लागेल. दुसऱ्या टप्प्यात १ डिसेंबर २०२६ पासून बजावण्यात येणाऱ्या पात्र चलानांचा समावेश असेल. चलान विधिपूर्वक बजावल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या आत दंड भरल्यास २० टक्के सवलत मिळेल. हा लाभ ३० नोव्हेंबर २०२७ पर्यंत उपलब्ध असेल. तिसऱ्या टप्प्यात ३० जानेवारी २०१९ ते २० जानेवारी २०२६ या काळात बजावलेली आणि १ डिसेंबर रोजी सक्षम न्यायालयात किंवा आभासी न्यायालयात प्रलंबित असलेली पात्र चलाने येतील. या प्रकरणांतही थकित तडजोड रकमेवर २० टक्के सूट मिळेल. सवलतीनंतरची रक्कम ३० दिवसांत भरावी लागेल.ही योजना वाहतूक पोलिसांनी किंवा त्यांच्या अधिकृत इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे बजावलेल्या चलानांनाच लागू असेल. परिवहन विभागाने जारी केलेली चलाने या योजनेत समाविष्ट नाहीत. मोटार वाहन अधिनियमाच्या कलम २०० नुसार तडजोड करता येणाऱ्या आणि २६ नोव्हेंबर २०२१ च्या अधिसूचनेतील संबंधित तरतुदींनुसार पात्र ठरणाऱ्या अपराधांनाच सवलत मिळेल. प्रत्येक पात्र अपराधासाठी देय थकित तडजोड



रकमेच्या ८० टक्के रक्कम भरावी लागेल. एकाच चलानात अनेक अपराध नोंदवले असतील आणि त्यापैकी एक जरी अपराध तडजोड न करता येण्याजोगा असेल, तर संपूर्ण चलान सवलतीसाठी अपात्र ठरेल. सर्व अपराध तडजोडयोग्य असतील, तर संबंधित व्यक्तीच्या संमतीने त्यांची एकत्रित तडजोड करता येईल.न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांत सक्षम पोलीस अधिकारी संबंधित व्यक्तीच्या संमतीने न्यायालयाच्या आदेशानुसार तडजोडीची प्रक्रिया पूर्ण करतील. चलान आणि न्यायालयीन प्रकरण क्रमांकाची पडताळणी करून भरणा स्वीकारला जाईल. त्याचा पुरावा आणि तडजोडीचा अहवाल न्यायालयात सादर केल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार प्रकरणाचा निपटारा नोंदविला जाईल. अन्य पात्र चलानांचा भरणा वाहतूक पोलिसांच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन किंवा जवळच्या वाहतूक पोलीस विभागात रोखीने करता येईल.मुदत संपल्यानंतर कठोर कारवाई

- अभय योजना सुरू होण्यापूर्वी भरलेल्या चलानाच्या दंडाचा परतावा मिळणार नाही. रद्द झालेली किंवा निकाली निघालेली चलानेही सवलतीसाठी पात्र नसतील. न्यायालयाची स्थगिती असलेल्या प्रकरणांत संबंधित आदेशानुसार कार्यवाही केली जाईल. नव्या चलानांसाठीची ४५ दिवसांची सवलत ही योजनेपुरती असून, केंद्रीय मोटार वाहन नियमांतील भरणा आणि हरकतीच्या वैधानिक मुदती कायम राहतील.- योजनेचे टप्पे संपल्यानंतर प्रचलित कायदे आणि नियमांनुसार दंड आकारला जाईल. वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर परवाना निलंबित करणे, वाहनाशी संबंधित व्यवहारांवर निर्बंध आणणे किंवा वाहन जप्त करणे यांसारखी कारवाई केली जाईल. योजनेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी 'रस्ता सुरक्षा निधी'तून खर्च करण्यात येणार आहे.

द्वारका सर्कलला मिळणार वाहतूक कोंडीतून दिलासा,



नाशिक : प्रतिनिधी

नाशिक : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासकामांना वेग आला आहे. अशातच पुणे रोडवरून नाशिकमध्ये येणाऱ्या वाहनधारकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. द्वारका सर्कल परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या इंटरचेंज प्रकल्पातील १०० मीटर लांबीचा भुयारी मार्ग जानेवारीअखेर वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता आहे. मात्र, मुंबई आणि धुळे बाजूकडील वाहनधारकांना कुंभमेळ्यापर्यंत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार आहे.द्वारका इंटरचेंजचे 80 टक्के काम पूर्णद्वारका इंटरचेंज प्रकल्पाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. उड्डाणपुलाखाली मर्यादित जागा आणि अभियांत्रिकीविषयक अडचणी असतानाही महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडून म पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या प्रकल्पातील एकूण ५६३ मीटर लांबीच्या इंटरचेंजचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. पुणे बाजूकडील रॅम्प आणि भुयारी मार्गाचे दोन टप्पे पूर्ण झाले आहेत.

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी

दिल्ली : प्रतिनिधी

दिल्ली : लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत केंद्र सरकारने राजकीय पक्षांशी चर्चा सुरू केली आहे. 2011 च्या जनगणनेच्या आधारावर लोकसभा आणि विधानसभेच्या जागांमध्ये सुमारे 50 टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. मात्र, राज्यांमधील जागांचे सध्याचे प्रमाण कायम ठेवण्यावर सरकारचा भर आहे. त्याचबरोबर महिलांसाठी प्रत्येक तिसरी जागा राखीव ठेवण्याच्या आणि त्यासाठी लॉटरी पद्धतीचा अवलंब करण्याच्या पर्यायांवरही चर्चा सुरू आहे.अमित शाह यांची विविध पक्षांच्या नेत्यांशी चर्चामतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत व्यापक सहमती निर्माण करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी संसद भवनात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली. सूत्रांच्या माहितीनुसार, त्यांनी बीजेडी,वायएसआरसीपी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (उबाठा) आणि एमआयएमच्या नेत्यांशी चर्चा केली.यानंतर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमके आणि समाजवादी पक्षाच्या नेत्यांशीही



चर्चा केली जाणार आहे. सर्व पक्षांची मते जाणून घेतल्यानंतर सरकार याच संसदीय अधिवेशनात घटनादुरुस्ती विधेयक आणण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे.लोकसभेच्या जागा 50% वाढवण्याचा प्रस्तावप्रस्तावानुसार, लोकसभा आणि विधानसभा जागांमध्ये सुमारे 50 टक्के वाढ केली जाऊ शकते. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशातील लोकसभेच्या सध्याच्या 80 जागांची संख्या वाढून 120 पर्यंत जाऊ शकते. मात्र, राज्यांच्या एकूण जागांमधील परस्पर गुणोत्तर कायम ठेवण्याचा विचार आहे.

हिलांसाठी दर तिसरी जागा राखीव?महिला आरक्षण लागू करण्याच्या पद्धतीवरही बैठकीत चर्चा झाली. दर तिसरी जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव असून, त्यासाठी लॉटरी पद्धतीचा अवलंब केला जाऊ शकतो. मात्र, आरक्षित जागा कायमस्वरूपी असतील की ठराविक कालावधीनंतर रोटेशन पद्धतीने बदलल्या जातील, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.दक्षिण भारतातील राज्यांच्या चिंता दूर करण्याचा प्रयत्न2029 पर्यंत जनगणनेची प्रक्रिया पूर्ण होण्यास विलंब होऊ शकतो, असे सरकारचे मत आहे. त्यामुळे 2011 च्या जनगणनेच्या आधारावर मतदारसंघ पुनर्रचना करण्यासाठी घटनादुरुस्तीचा पर्याय विचारात घेतला जात आहे.

यासाठी परिसीमन आयोग कायदा आणि महिला आरक्षण कायद्यात आवश्यक बदल केले जाऊ शकतात.लोकसंख्येच्या प्रमाणात जागा वाढवल्यास दक्षिण भारतातील राज्यांचे राजकीय प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्यांमधील जागांचे गुणोत्तर कायम ठेवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. सर्व राजकीय पक्षांशी चर्चा पूर्ण झाल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार असून, गरज पडल्यास संसदेचे अधिवेशन वाढवले जाऊ शकते किंवा विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते.

आदिवासी तरुणांसाठी ड्रोन पायलट प्रशिक्षणाची संधी, 'अमृत ड्रोन मिशन'मध्ये सहभागाचे आवाहन



शेतीपासून उद्योग क्षेत्रापर्यंत सध्या ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशातच आता आदिवासी युवक-युवतींसाठी ड्रोन पायलट बनण्याची संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात 'अमृत' आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच टीआरटीआय यांच्यात यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या करारामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र युवक-युवतींनाही आता अमृतच्या 'अमृत ड्रोन मिशन' अंतर्गत ड्रोन पायलट प्रशिक्षण घेता येणार आहे. या प्रशिक्षणात ड्रोन तंत्रज्ञानाचे सैद्धांतिक ज्ञान, प्रत्यक्ष उड्डाणाचे प्रात्यक्षिक आणि व्यावसायिक कौशल्ये शिकवली जाणार आहेत.विशेष म्हणजे, शेतीमध्ये कीटकनाशकांची फवारणी, पिकांचे निरीक्षण, जमिनीचे सर्वेक्षण आणि मॅपिंग अशा विविध कामांसाठी ड्रोनचा वापर वाढत आहे. त्यामुळे हे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात. तसेच स्वतःचा ड्रोन सेवा व्यवसाय सुरू करून स्वयंरोजगाराचा मार्गही खुला होणार आहेआर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दरम्यान, प्रशिक्षणासाठी जागा मर्यादित असल्याने अनुसूचित जमाती प्रवर्गातील इच्छुक आणि पात्र युवक-युवतींनी लवकरात लवकर अर्ज प्रक्रिया पूर्ण करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृतचे विभागीय व्यवस्थापन मंगेश खाडीलकर यांनी केले आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकावर 1.22 कोटींचे चरस जप्त;

मुंबई : प्रतिनिधी

मुंबई : मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या (एएनसी) वरळी युनिटने लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) येथे मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत अंदाजे 1.22 कोटी रुपये किमतीचे 12 किलो 200 ग्रॅम चरस जप्त करण्यात आले. याप्रकरणी दोन कथित अंमली पदार्थ तस्करांना अटक करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंमली पदार्थांची खरेदी-विक्री, पुरवठा आणि साठवणूक करणाऱ्या दोन व्यक्तींबाबत एएनसीला गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे 24 ते 25 नोव्हेंबरदरम्यान पोलिसांच्या पथकाने एलटीटी परिसरात सापळा रचला. यावेळी दोन संशयितांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेण्यात आली. त्यांच्या ताब्यातून 12 किलो 200 ग्रॅम चरस आढळले. जप्त करण्यात आलेल्या चरसची किंमत अंदाजे 1.22 कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले.या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात अमली पदार्थ आणि मनःप्रभावी पदार्थ प्रतिबंधक कायदा (NDPS Act),



1985 अंतर्गत कलम 8(क), 20(क), 29 आणि संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपासासाठी पोलीस पथक उत्तर प्रदेशातअटक केलेल्या आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. जप्त केलेल्या चरसचा स्रोत शोधणे आणि या कथित तस्करी नेटवर्कमध्ये सहभागी असलेल्या इतर व्यक्तींची माहिती मिळवणे, हा तपासाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी मुंबई पोलिसांचे एक पथक उत्तर प्रदेशात रवाना झाल्याचे वृत्त आहे.मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, सह पोलीस आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे आणि अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. एएनसीच्या वरळी युनिटसह मुंबई पोलीस गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

दक्षिणेत पावसाचा तडाखा, उत्तरेत दाट धुक्याचा कहर!

नवी दिल्ली : प्रतिनिधी

नवी दिल्ली : देशातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल होण्याची चिन्हे दिसत असून, भारतीय हवामान विभागाने 27 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर या कालावधीसाठी सविस्तर हवामानाचा अंदाज जाहीर केला आहे. दक्षिण भारतातील अनेक राज्यांमध्ये पावसासह वादळी वाऱ्यांचा जोर कायम राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच अंदमान आणि निकोबार बेटांवर 30 नोव्हेंबर आणि 1 डिसेंबर रोजी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे, उत्तर आणि पूर्व भारतातील अनेक राज्यांमध्ये दाट धुक्याची चादर पसरण्याचा अंदाज असून, पूर्व राजस्थानच्या काही भागांत शीतलहरीचा इशारा देण्यात आला आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, केरळ, माहे आणि लक्षद्वीपमध्ये 27 ते 28 नोव्हेंबर दरम्यान अनेक ठिकाणी पावसाच्या सरी कोसळू शकतात. किनारपट्टी आंध्र प्रदेश, यानम, रायलसीमा, तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल या भागांत 27 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर पर्यंत अधूनमधून पाऊस पडण्याची शक्यता आहे. केरळ आणि माहे येथे 29 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर दरम्यानही पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज आहे. कर्नाटकच्या किनारपट्टी आणि दक्षिण अंतर्गत भागांत 27 ते 28 नोव्हेंबर दरम्यान, तर तेलंगणा आणि उत्तर अंतर्गत कर्नाटकात 27 नोव्हेंबर रोजी पाऊस पडण्याची शक्यता आहे.पावसासोबतच दक्षिण भारतातील काही भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, यानम, केरळ, माहे, लक्षद्वीप, रायलसीमा आणि तमिळनाडू-पुद्दुचेरीमध्ये ताशी 30 ते 40 किमी वेगाने वारे वाहू शकतात, तर काही ठिकाणी वाऱ्यांचा वेग ताशी 50 किमी पर्यंत जाण्याची शक्यता आहे. केरळ, माहे आणि तमिळनाडू-पुद्दुचेरीमध्ये 27 नोव्हेंबर रोजी मुसळधार पाऊस होऊ शकतो. लक्षद्वीपमध्ये 26 आणि 27 नोव्हेंबर दरम्यान अतिवृष्टीचा अंदाज व्यक्त केला गेला आहे.



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

पासपोर्ट कार्यालयाच्या धर्तीवर मुंबईत 'आदर्श दुय्यम निबंधक' कार्यालय

मुंबई : प्रतिनिधी



मुंबई : पासपोर्ट कार्यालयाच्या धर्तीवर राज्यात प्रायोगिक तत्त्वावर उभारण्यात आलेले पहिले आदर्श सह दुय्यम निबंधक कार्यालय मुंबईतील लोअर परळ येथील मफतलाल टॉवरमध्ये सुरू झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. आधुनिक पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञान आणि नियोजित भेटीच्या माध्यमातून मालमत्ता नोंदणीची प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोनशिलेचे अनावरण करून आणि फीत कापून कार्यालयाचे उद्घाटन केले. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, राज्याचे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर मुख्यमंत्र्यांनी कार्यालयाची पाहणी करून तेथील सुविधांची माहिती घेतली.या कार्यालयात शासकीय नोंदणी सेवा, डिजिटल तंत्रज्ञान, व्यावसायिक ग्राहक सेवा आणि आधुनिक पायाभूत सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नियोजित भेटीनुसार नोंदणी प्रक्रिया राबविणे, पावत्या घेऊन कार्यालयात उपस्थित राहावे लागेल. प्रवेशापूर्वी सुरक्षा कर्मचारी भेटीची वेळ आणि कागदपत्रांची पडताळणी करतील. त्यानंतर स्वागत कक्षातील कर्मचारी प्राथमिक तपासणी करून रांग व्यवस्थापन प्रणालीद्वारे टोकन देतील.नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रांचे अनुक्रमणीकरण, पृष्ठांकन, मुद्रांकन आणि स्कॅनिंग केले जाईल. त्यानंतर ही कागदपत्रे शासकीय नोंदणी प्रणालीमध्ये अपलोड केली जातील. त्यामुळे अभिलेखांचे सुरक्षित व्यवस्थापन आणि डिजिटल जतन होण्यासह त्यांचा मागोवा घेणे व भविष्यात आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. स्कॅनिंग आणि गुणवत्ता तपासणी पूर्ण झाल्यानंतर नोंदणीकृत दस्तऐवज आणि पोचपावती नागरिकांना रीतसर पोच घेऊन दिली जाईल.

्वागत कक्षासह प्रतीक्षा कक्षाची सुविधाकार्यालयात स्वतंत्र स्वागत कक्ष, नागरिक सहायता सेवा, रांग व्यवस्थापन यंत्रणा आणि आरामदायी प्रतीक्षा कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे. या सुविधांमुळे नागरिकांना नोंदणीसाठी लागणारा वेळ कमी होण्यास मदत होईल. तसेच मालमत्ता नोंदणीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेला राष्ट्रवादी शरद पवार गटाचा पाठिंबा



मुंबई : प्रतिनिधी

मुंबई : मतदारसंघ पुनर्रचना अर्थात डिलिमिटेशनच्या विधेयकाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा पाठिंबा असल्याचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. मतदारसंघ पुनर्रचना ही घटनात्मक प्रक्रिया असून ती करावीच लागते, त्याला पर्याय नाही, असे शरद पवार यांनी अनौपचारिक चर्चेत सांगितल्याचा दावा आव्हाड यांनी केला. 'पवारसाहेब माझे दैवत आहेत. त्यांची जी भूमिका आहे, तीच माझी भूमिका आहे,' असे सांगत डिलिमिटेशनला पाठिंबा देण्याचा निर्णय झाल्याचेही त्यांनी जाहीर केले.

शरद पवार यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू असून, आव्हाड यांनी शुक्रवारी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली. प्रकृतीची विचारपूस केल्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी मतदारसंघ पुनर्रचनेबाबत पक्षाची भूमिका विचारली असता आव्हाड यांनी शरद पवार यांच्याशी झालेल्या चर्चेचा संदर्भ दिला. मतदारसंघांची पुनर्रचना आवश्यक असते, असे पवार यांनी आपल्याला अनौपचारिक चर्चेत सांगितल्याचे ते म्हणाले. आठ खासदारांना सोबत घेऊन सुप्रिया सुळे यांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शरद पवार यांना उद्या किंवा परवा रुग्णालयातून डिस्चार्ज मिळण्याची शक्यता असल्याचेही आव्हाड यांनी सांगितले.

धूम्रपान करू नका, एवढेच सांगितले अन् चाकूने हल्ला! ठाकुर्ली स्थानकावरील धक्कादायक घटना

रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक ठिकाणी सिगारेट आणि बिडी ओढण्यास विरोध केल्याने प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यावर थेट चाकूने हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना ठाकुर्ली रेल्वे स्थानकावर घडली आहे.नियमांचे पालन करण्यास सांगणे एका पदाधिकाऱ्याला चांगलेच महागात पडल्याचे या घटनेतून समोर आले आहे. या प्रकारामुळे रेल्वे प्रवाशांमध्ये संताप व्यक्त केला जात असून स्थानक परिसरात एकच खळबळ उडाली आहे.नेमकी घटना काय?मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ठाकुर्ली रेल्वे स्थानक परिसरात काही व्यक्ती सिगारेट आणि बिडी ओढत होत्या. रेल्वे स्थानक हे सार्वजनिक ठिकाण असल्याने येथे धूम्रपान करण्यास मनाई आहे. मात्र, काही जणांकडून या नियमांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे पाहायला मिळत होते. याचदरम्यान प्रवासी संघटनेच्या एका पदाधिकाऱ्याने संबंधित व्यक्तींना धूम्रपान करण्यास विरोध केला.i)सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करू नका, अशी समज देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मात्र, संबंधित व्यक्तींना हा विरोध सहन झाला नाही. धूम्रपान करण्यास मनाई केल्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद निर्माण झाला. सुरुवातीला शाब्दिक स्वरूपात असलेला हा वाद पुढे चिघळला. त्यानंतर संबंधित व्यक्तींनी प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यावर चाकूने हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे.यिमांचे पालन करण्यास सांगितल्याचा राग!या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास विरोध केल्यामुळे हा प्रकार



घडल्याचे सांगितले जात आहे. रेल्वे स्थानकांवर लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि हजारो प्रवाशांची दररोज वर्दळ असते. अशा ठिकाणी धूम्रपान केल्याने इतर प्रवाशांनाही त्रास होऊ शकतो. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानासंदर्भातील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

मात्र, एखाद्याने नियमांची जाणीव करून दिल्यानंतर त्याच्यावर हल्ला करण्यापर्यंत मजल जाणे ही गंभीर बाब आहे. या घटनेमुळे रेल्वे स्थानकांवर प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित होत आहेत.मुंबई आणि उपनगरांमधील रेल्वे स्थानकांवर दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. गर्दीच्या ठिकाणी किरकोळ कारणांवरून वाद होण्याच्या घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. मात्र, नियमांचे पालन करण्यास सांगणाऱ्या व्यक्तीवर चाकूने हल्ला होण्याची घटना चिंताजनक आहे. अशा घटनांमुळे सामान्य प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. रेल्वे स्थानक परिसरात सुरक्षेसाठी रेल्वे पोलीस आणि इतर सुरक्षा यंत्रणा कार्यरत असतात. तरीही अशा घटना घडत असल्याने स्थानकांवरील सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत चर्चा सुरू झाली आहे.दरम्यान, ठाकुर्ली स्थानकावरील या घटनेत जखमी पदाधिकाऱ्याची प्रकृती कशी आहे, हल्ल्यामागे नेमके कोण होते आणि या प्रकरणात किती जणांचा सहभाग आहे, याबाबत अधिकृत तपशील समोर येणे बाकी आहे. तसेच पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईची माहितीही अद्याप स्पष्ट झालेली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास आणि कारवाईकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे





मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

काशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-1 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.**: MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**